Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed


## Multidisciplinary International Research Journal

**January -2021**

**ISSUE No- (CCLXX) 270**






**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
**Principal**
**Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.**

**Executive Editor:**
**Dr.Sanjay J. Kothari**
**Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati**

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 20 | आंबेडकरी विचारकाव्य एक विहंगमावलोकन प्रा.डॉ.स्मिता शेंडे | 88 |
| 21 | फळबाग लागवड तंत्र प्रा. डॉ.संतोष एन.ताडे | 96 |
| 22 | जगाच्या इतिहासात धम्मपद हा ग्रंथ अमूल्य ज्ञानाचा सागर आहे. डॉ. अजय खडसे | 98 |
| 23 | जागतिकीकरणोत्तर दलित कविता डॉ. सुनील अभिमान अवचार | 101 |
| 24 | भारतातील महिला विकास संबंधी योजनांचे अध्ययन प्रा. डॉ. सुनिता श्रीकृष्ण बाळापुरे | 108 |
| 25 | कोविड २०१९ चा भारतीय कृषी अर्थव्यवस्थेवरील परीणाम दिपक एन. काळे | 112 |
| 26 | भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये रुपयाचे अवमुल्यन होण्याची कारणे डॉ. केशव सुर्यभानसा गुल्हाने | 116 |
| 27 | लोकशाहीतील स्त्रियांचा दर्जा कल्पना बंडीवार | 119 |
| 28 | १९९० नंतरचे समाजवास्तव व मराठी कवितेचे स्वरूप प्रा. मनीषा नामदेव बनसोडे | 122 |
| 29 | लोककल्याणकारी राज्य की निर्मिती में राजनिती के निर्देशक सिद्धांतों का महत्व डॉ.विभा प्र.देशपांडे | 125 |
| 30 | पारंपारिक स्त्री से आधुनिक स्त्री तक: एक प्रवास डॉ. फरहिना शिरीन नसिरोद्दीन | 128 |
| 31 | दिव्यांग व्यक्तियों का वर्तमान परिदृश्य विवेक संतोषराव गोर्लावार | 134 |
| 32 | हिंदी के आँचलिक उपन्यास और उनका महत्व लेफ्टनंट डॉ. रविंद्र पाटील | 142 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 270 (CCLXX) | January, 2021

# कोविड २०१९ चा भारतीय कृषी अर्थव्यवस्थेवरील परीणाम

दिपक एन. काळे
स.प्रा. वाणिज्य विभाग, मोर्शी भारतीय महाविद्यालय, मोर्शी

भारतासाठी आर्थिक वर्ष २०२०—२१ हे अत्यंत त्रासाचे कष्टाचे आणि विशेष म्हणजे अर्थव्यवस्थेतील विकासावर प्रतिकुल परीणाम करणारे अनुभवास आले. २०१६ या वर्षीच्या निश्चलनीकरणानंतर आर्थिक घसरणीत झालेली सुरुवात वाढत जाऊन तीची तिव्रता आणि व्याप्ती सातत्याने वाढतच गेली. तिचे वाईट सामाजिक आर्थिक परीणाम देशाला व समाजाला भोगावे लागत आहे. त्यावर नियंत्रणाचे धोरण राबवित असतांना अतिवृष्टी व महापुराचा झटका महाराष्ट्र व इतर राज्यांना सहन करावा लागला. त्यामुळे या नैसर्गीक आपत्तीतुन बाहेर निघण्यापुर्वीच कारोना महामारीचे संकट येवुन उभे राहीले.

देशातील कोणत्याही प्रकारचे नैसर्गिक, राजकीय, आर्थिक आणि आरोग्य विषयक संकटाचे देशाच्या विकासावर प्रतिकुल व घातक परीणाम दिसुन येते. कोविड—२०१९ ची लागण नियंत्रीत करण्याकरिता आपण स्विकारलेल्या टाळेबंदीचे अंत्यत प्रतिकुल परीणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले दिसुन येते आहे. जागातील १९६ देशापैकी १७५ देशात ही महामारी अस्तित्वात होती. दिनांक ३० जानेवारी २०२० ला पहीली कोरोना बाधीत व्यक्ती केरळमधील थ्रिसुरमध्ये आढळली ज्याचा केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब नियोजन मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २ एप्रिल २०२० ला भारतात एकुण २०० केसेस आढळल्या त्यात १५१ रुग्ण बरे झाले, तर येथुन सुरुवात होऊन २० जुलै २०२० रोजी जगात कोरोनाबंधीताची एकुण संख्या १४.४६ दशलक्ष ऐवढी होती. त्यातील ८. ६४ दशलक्ष रुग्ण त्यादिवशी भारतात एकुण १०,८१,४९७ लोक भारतात कोरोना बाधीत होते. त्यापैकी ६,८१,००३ लोक कोरोनावर मात करुन बरे झाले. त्यापैकी महाराष्ट्रात ३,००,९३७ रुग्ण सर्वाधिक रुग्ण होते. तामीळनाडु (१६५,७१४) दिल्ली (१,२२,७९३) कर्नाटक (५९६५२) आणि गुजरात (४७,४७६) ऐवढी रुग्ण संख्या होती. त्यामध्ये कोरोना बाधीताची रुग्ण काही शहरातच बेंगलोर, अहमदाबाद, कोलकत्ता, पालघर या शहरात तिव्र अशी लागत वाढत होती.

१. अशी ही कोरोना महामारी संकट असतांना टाळेबंदी स्विकारली असतांना त्याचे देशाच्या आर्थिक वृध्दीवर होणारा परिणाम दिसुन आलेला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालाप्रमाणे भारताचा व्यापार परीणाम घटेल भारत हा देशातील प्रतिकुल परीणाम झालेला १५वा देश असेल असे सांगीतले. आशियाई विकास बॅंकेच्या अभ्यासाप्रमाणे २९.९ अब्ज अमेरिकन डॉलरमध्ये आर्थिक नुकसान होईल. बी. एस. ई.चा निर्देशांके ३५६३५ वरुन १९४२ पर्यंत तर एस. एस. ईचा निर्देशांक १०,४५१ वरुन ५३८ पर्यंत पोहचला.

भारताचा G. D. P. जुलै २०१९ मधील ५.२ टक्क्यावरुन टाळेबंदी नतरच्या काळात ३.१ टक्के पर्यंत घटले आणि पुढे त्यापेक्षाही घटत गेला.

सर्वच आर्थिक क्षेत्रात घट आलेली दिसुन आली आहे. भारतातील उद्योग क्षेत्राचे ३८% चे नुकसान झाले. कोळसा उत्पादन १५.५% ने घटले. कुड तेलाचे उत्पादन ६.७% वरुन ६.४% आले तसेच नैसर्गिक वाढ उत्पादन १९.९०% नी घटले. सिंमेट उत्पादन ८६% ने घटले. खते उत्पादन ४.५% ने आणि कुड तेलाचे उत्पादन ६.८% नी घटले.

- केविड २०१९ च्या टाळेबंदीमुळे शेती क्षेत्रावर होणारा परिणाम :—

देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेले कोरोना महामारीचा परीणाम २०२१ या आर्थिक वर्षाच्या पहील्या तिमाहीत देशाच्या दरडोई उत्पन्नात २३.९ टक्क्यानी घट झाली कोरोनाची साखळी तोडण्यासाठी सरकारने लागु केलेल्या लॉकडाऊन तसेच व्यापार दळणवळणार अनेक निबंधामुळे अर्थव्यवस्थेतील प्रमुख सर्वच क्षेत्राची पुरवठा साखळी खंडीत झाली. देशात भिषण परिस्थिती निर्माण झाली असतांना स्थि आणि कमी गुंतवणूकीतुन ३.४% दरडोई उत्पन्न देणारे शेती आणि शेतीपूरक उद्योग आपल्या अर्थव्यवस्थेला तारणहार ठरले.

२. २०२०—२१ या आर्थिक वर्षात कोरोना टाळेबंदीमुळे भाजीपाला, फळे, मिरची, लसुन, भात, गहु, सोयाबीन, हरभरा कापुस ज्वारी, या सर्व पिकाचे अती पावसामुळे नुकसान भरपुर प्रमाणात झाले. तसेच द्राक्षे, पेरु, काजु, चिक्कु, संत्रा, आंबा, कलिंगड व इतर फळफळाची काढणी न झाल्यामुळे नुकसान झाले आहे. तसेच प्रक्रिया उद्योगात दुग्ध कुक्कुटपालन फळप्रक्रिया उद्योग बंद राहील्याने शेती आणि शेतीसंबंधी उद्योगाचे नुकसान होऊन उबघाईस आले.

फळे भाजीपाला यांच्या किंमती कमी झाल्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. भाजीपाला फळे कडधान्ये यांची विक्री होत नसल्यामुळे श्रमिकांना मजुरी न मिळाल्यामुळे उपासमारीची वेळ त्याच्यावर उपासमारीचा वेड आली होती. एकुण शेतकऱ्यापैकी ५४.९% भुमिहीन, तर ४५.१०% अल्पभुधारक आहे. ४०० दशलक्ष लोकांना टाळेबंदीचा फटका बसला रोजगार बंद झाल्याने. औद्योगिक कामगाराचीही शेतमालाला मागणी कमी झाल्याने सन २०१८—१९ मध्ये शेतीमाल निर्यातीपासुन भारताला ३८ अब्ज मिळाले होते. ते निर्यातीचे उत्पादनावर पूर्णतः सोडावे लागले.

कोरोना महामारीचे परीणाम शहरी भागात जास्त प्रमाणात असल्यामुळे दिल्ली, पुणे, मुंबई, मद्रास ईत्यादी शहरात शेतमालाचा उठाव झाला नाही. प्रत्येक शेतकऱ्याचे लाखो रुपयाचे नुकसान झााले. कोविड महामारी प्रत्येक राज्यावर वेगवेगळया परीणाम झाला. मध्यप्रदेशात कलिंगडाचे उत्पादन होणारे शेतकरी पुर्णतः तोटयात आले.

साखर कारखाने बंद असलयामुळे ऊस तोडणी बंद राहील्याने कामगार येवूनही ते काम करु शकले नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. तर शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. खरीप हंगामातील तयारी, मशागत बी—बियाणे, अवजारे उपलब्ध करणे आर्थिकदृष्टया कठीण झाले होते. टाळेबंधीच्या शेती आणि क्षेत्रनिहाय वेगवेगळया आहे. यातुन जरी सध्या धान्यसाठा पुरेसा असला तरी भविष्यात धान्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे मत भारतीय शेती संघर्ष समितीचे समन्वयक अविक शहा व्यक्त करतात.

३.हापुस आंब्यापैकी ५५% उत्पादन महाराष्ट्रात होते आणि त्यासहीत मुबई, पुणे, कोल्हापुर ही मोठी बाजारपेठ आहे. मागणीत घट झाल्यामुळे उत्पादकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झााले. वाहतुक व पॅकेजींग न झाल्यामुळे ७०% मागणी कमी झाली आहे. त्यामुळे जर शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला नाही. तर ते कोरोनामुळे उपासमारीची वेळ आली होती.

पंजाब व हरीयाणामधील गहू बिहरपर्यंत पोहचला नाही मक्याची आधारभुत किंमत १७६० रुपये प्रति क्विंटल असतांना ११०० रुपयांना विकावा लागला मध्यप्रदेशात उठाव नसल्याने चऱ्याला प्रति क्विटल ६०० ते ७०० रुपये कमी मिळाले. वास्तविक शेतकऱ्यांना रोख मदत देणे आवश्यक आहे. मात्र दुसऱ्याच बाजुने काही शेतमालाच्या किंमती मात्र वाढुन त्याचा आर्थिक बोजा गरिबावर पडत आहे.

तृणधान्याच्या बाबतीत भाववाढ एप्रिल २०१९ मधिल १.२% वरुन मार्च २०२० मध्ये ५.३% तर एप्रिल २०२० मध्ये ७.८% पर्यंत वाढली तर या काळात कोविड–१९ टाळेबंदी हाणीकारक ठरली.

संध्यास्थितीत कोविड परीणाम भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचे नुकसान होत आहे. कोरोणा महामारीमुळे न्युज चॅनल आजतकच्या माहीतीनुसार ६६% लोकांच्या उत्पादनात घट झाली, तर १९ लोकांचे रोजगार गेले व फक्त ३% लोकांचे उत्पादन वाढले, तर १२% लोकांच्या उत्पादनात काही फरक नाही असे वर्तविले.

कोरोणा काळात शेतकऱ्यांचा ३ कृषी कायदे लादल्या_गेल्यासारखे असल्यामुळे सध्या देशात तिन कायाद्याचा पेच आणि शेतकरी उत्पादनावर आलेली. हमी भावावर असलेली (सदोषपूर्ण हमीभाव प्रक्रीया)

४.त्यामध्ये प्रतवारी MSP चा फायदा शेतकऱ्याऐवजी उद्योग व्यवसायिकांना होताना दिसते. फळाच्या बाजारात दळणवळण हे दिल्ली राजधानी केंद्रस्थानी असलेल्या शेतकरी आंदोलनामुळे कृषी अर्थव्यवस्थेला (उत्पादन) कमी किंमत मिळत आहे. सध्याची जी राज्यव्यवस्था आहे ती राजकीय स्वरुपाची असुन कृषी केंद्रीत नसल्याप्रमाणे असल्याचे आढळुन येते.

एकंदरित विचार केल्यास (कंत्राटी फॉर्मिंग व्यवस्था) यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल असे शासन दर्शवित आहे. तसेच मालकी ही शेतकऱ्यांची राहील असे सरकार सांगत आहे. परंतु जमिनीवरील सातबाऱ्यावर बोजा, बँकांचे कर्ज, पिक विमा, पिक विमा घेण्यासंबंधीचा अधिकार याबाबतीत संभ्रम निर्माण झाला आहे. तसेच शेतकऱ्यांचा आधारभुत किंमतीबाबत ठोस लेखी आश्वासन कायद्यात हवे आहे. परंतु याबाबत तोंडी आश्वासन देत आहे. मात्र कायद्यात तशी तरतुद करायला तयार नाही.

- **शेतकरी उत्पादनाबाबत तीन कायदे :—**

१. शेतकरी उत्पादने वाणिज्य प्रोत्साहन व सुविधा कायदा २०२०

२. शेतकरी (सशक्तीकरण व संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२०

३. अत्यावश्यक वस्तु (दुरुस्ती) कायदा २०२०

या तिन कायद्यांना शासनाने मान्यता दिली असतांना यातिनही कायद्याचा परीणाम शेतकऱ्यांवर वाईट होईल असे शेतकऱ्यांना वाटत आहे. तर मुक्त व्यापार व्यवस्था मान्य असतांना देखिल फायदा होणार आहे. असे सरकारचे म्हणणे आहे. परंतु याकायद्यातील संभ्रमाव्यस्था मात्र कायम आहे. शेतकऱ्यांच्या कायद्यासंबंधी मागण्यांचा संप ५० ते ५५ दिवस उलटुनही यावर काही निष्पन्न होतांना दिसुन नाही तरी पण यात योग्य ती सुधारणा करुन शेती क्षेत्राचा विकास व्हावा जेणे करुन सर्वात मोठी लोकसंख्या या क्षेत्रावर अवलंबुन असल्याममुळे या क्षेत्रातील शेतकऱ्यांना योग्य तो निर्णय होवुन स्वतंत्र्य शेती, सेंद्रीय शेती आणि उत्कृष्ट कृषी व्यवस्था निर्माण व्हायला पाहिजे.

सध्यास्थिती कृषी क्षेत्रांची वाईट आहे. व त्या क्षेत्राला बळकटी यावी.

- **संदर्भ :—**

१. अर्थसंवाद अंक जुलै सप्टेंबर २०२०

२. योजना नोव्हेंबर २०२०

३. देशोन्नती–पेंच तिन कायद्याचा, अनंत बोरसे, दि. १७ जाने २०२१

४. देशोन्नती–महाशक्तीपान, प्रकाश पोहरे, दि. १७ जाने २०२१

५. न्युज आज तक–दि. २१ जाने २०२१